**गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना**
**योजनेची व्याप्ती वाढवून निकषांमध्ये सुधारणा**
**करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक - गटई-२००६/ प्र.क्र.२०२/मावक-२
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ फेब्रुवारी २००८.

**वाचा** : १) शासन निर्णय,सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, व क्रीडा विभाग,
क्रमांक - -विघयो-१०९७/ प्र.क्र. १७५ /मावक-२,दिनांक ३१ डिसेंबर १९९७
२) शासन निर्णय,सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, व क्रीडा विभाग,
क्रमांक - -विघयो-२००५/ प्र.क्र. १५१ /मावक-२,दिनांक २३ नोव्हेंबर २००६
३) शासन पत्र क्रमांक : विघयो २००५/प्र.क्र.१५१/मावक २,
दिनांक २८ डिसेंबर, २००६
४) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्रमांक - गटई-२००६/ प्र.क्र.२०९ /मावक-२ दिनांक २१ जून २००७

**प्रस्तावना** :- महाराष्ट्र राज्यामध्ये चामडयाच्या वस्तु व पादत्राणे दुरुस्तीच्या क्षेत्रात मोठया प्रमाणावर अनुसूचित जातीच्या व्यक्ती असून त्यांच्या उपजिवीकेचा प्रश्न यांच्याशी निगडीत आहे. या पादत्राणे दुरुस्त करणारे व्यावसायिक हे रस्त्याच्या कडेला उन्ह पावसात बसून आपली सेवा देत असतात. ज्या व्यावसायिकांना ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण मिळावे तसेच त्यांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी ग्रामपंचायत, नगरपालिका क्षेत्रात १००% शासकीय अनुदानावर गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना शासन निर्णय दिनांक ३१ डिसेंबर १९९७ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजना सन २००२-०३ पर्यंत शासनामार्फत राबविण्यात येत होती. सन २००३-०४ पासून ही योजना संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मुंबई मार्फत राबविण्यात येत होती. तथापि, सन २००३-०४ व २००४-०५ या वर्षामध्ये महामंडळामार्फत सदर योजना राबविण्यात आलेली नाही. त्यामुळे सन २००५-०६ पासून ही योजना शासनामार्फत राबविण्यात येत आहे. तथापि, शासनामार्फत सदर योजना राबविण्यामध्ये अडचणी आल्याने ही योजना पुन्हा सन २००६-०७ पासून संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई मार्फत राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सदर योजनेसाठी निर्गमित करण्यात आलेले सर्व शासन निर्णय एकत्रित करुन नव्याने सूचना देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय** :- गटई कामगारांना ऊन,वारा, पाऊस यापासून संरक्षण मिळावे, तसेच त्यांची आर्थिक उन्नती व्हावी याकरीता ग्रामपंचायत व नगरपालिका क्षेत्रात १००% शासकीय अनुदानातून गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना शासन निर्णय क्रमांक - विघयो-१०९७/ प्र.क्र.१७५/मावक-२, दिनांक ३१.१२.१९९७ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. ग्राम पंचायत व "क वर्ग" नगरपालिका क्षेत्रासह या योजनेची व्याप्ती "अ वर्ग" व "ब वर्ग" नगरपालिका आणि छावणीक्षेत्र (कॅन्टॉन्मेंट बोर्ड) व महानगरपालिका क्षेत्रात वाढवून सदर योजना सन २००७-२००८ या वर्षापासून राबविण्यास शासन मान्यता देत आहे.

२. गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याच्या योजनेच्या नियम व अटी यासोबत जोडलेल्या **"परिशिष्ट - अ"** मध्ये नमूद केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे अर्जाचा विहित नमूना **"परिशिष्ट - ब"** मध्ये जोडलेला आहे.

३. वाटप करावयाच्या पत्र्याच्या स्टॉलचा तपशिल पुढीलप्रमाणे आवश्यक राहील.

अ) स्टॉल ४ फूट x ५ फूट x ६ १/२ फूट या आकारात २० गेज टीन पत्र्याचे असावेत.

ब) पत्र्याच्या तळातील व वरील व क्रूस अँगल फ्रेम तसेच ४ बाजूचे मुख्य अँगल हे ४०x४०x६ मि.मि. (आय.एस.आय.प्रमाणित) असावेत.

क) स्टॉलच्या तिनही बाजूस समान अंतरावर ३५ x३५ x३ मि.मि (आय.एस.आय.प्रमाणित) अँगल असावेत.

ड) स्टॉलचे छत २४ गेज जी.पी.शिटचे गोलाकार असावेत व २५ x२५ x३ मि.मि. (आय.एस.आय. प्रमाणित) चा अँगल आधाराकरीता वापरण्यात यावा.

इ) स्टॉलला शटर ऐवजी २२ गेजचा दोन बाजूला उघडणारा दरवाजा असावा.

ई) स्टॉलसाठी लागणारे सर्व हार्डवेअर मटेरिअल आय.एस.आय.प्रमाणित दर्जाचे असावे.

उ) स्टॉलच्या आतील व बाहेरील बाजूस ऑईलपेंट (वेदरप्रुफ) लावण्यात यावा.

ऊ) आतील बाजूस फिकट पिवळा रंग व बाहेरील बाजूस करडा रंग आणि स्टॉलच्या मध्यभागी एक फुटाचा केशरी रंगाचा पट्टा असावा. तथापि, मटेरियलवर ज्या ठिकाणी आय.एस.आय.मार्क दिलेला असेल तो स्पष्ट दिसेल याची दक्षता घ्यावी. (त्या ठिकाणी रंग देण्यात येऊ नये)

ए) तयार झालेल्या स्टॉलच्या दर्शनी भागावर **"महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग"** असे नांव टाकण्यात यावे.

४. सदर योजना २००६-०७ पासून संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांच्यामार्फत राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यासंदर्भात महामंडळाने व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी करावयाच्या कार्यवाहीची माहिती **"परिशिष्ट क"** मध्ये देण्यात आली आहे.

५. याबाबत होणारा खर्च "२२२५ - अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण, ०१ - अनुसूचित जातीचे कल्याण, १०२ - आर्थिक विकास, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना (०३)(०२) गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना (२२२५ २६२ २) ३१- सहाय्यक अनुदान, मागणी क्रमांक एन-२" या लेखाशिर्षाखाली खर्ची घालून त्याखाली केलेल्या वित्तीय तरतूदीमधून भागविण्यात यावा.

६. यासंदर्भात वर नमूद करण्यात आलेले यापूर्वीचे शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत.

७. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक क्रमांक २००८०२१३१६८४३०४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( स.मं.देनके )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.मुख्यमंत्री यांचे सचिव

मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव

मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव

मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव

मा.मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन यांचे उप सचिव

परिशिष्ट - अ

<u>गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याच्या योजनेचे नियम व अटी</u>

१ **योजना :-** राज्यातील गटई कामगारांना १००% अनुदान तत्वावर पत्र्याचे स्टॉल व रु.५००/- इतके रोख अनुदान देणे.

२ **लाभार्थ्यांची पात्रता :-**

अ) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व अनुसूचित जातीचा असावा.

ब) अर्जदाराच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न हे ग्रामीण भागात रु.४०,०००/- व शहरी भागात रु.५०,०००/- पेक्षा अधिक नसावे. (यासाठी तहसिलदाराने निर्गमित केलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र आवश्यक राहील)

क) अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

ड) अर्जदार ज्या जागेत स्टॉल मागत असेल ती जागा ग्रामपंचायत, नगरपालिका, छावणी बोर्ड (कॅन्टॉन्मेंट बोर्ड) किंवा महानगरपालिका यांनी त्यास भाडयाने, कराराने, खरेदीने अगर मोफत परंतु अधिकृतरित्या ताब्यात दिलेली असावी किंवा ती त्याच्या स्वमालकीची असावी.

३ **योजनेची व्याप्ती :-** सन २००७-२००८ पासून ही योजना ग्रामीण भाग "क" वर्ग नगरपालिका, "ब" वर्ग, "अ" वर्ग नगरपालिका तसेच महानगरपालिका क्षेत्रात व छावणी क्षेत्रात (कॅन्टॉन्मेंट बोर्ड) राबविण्यात येत आहे.

४ **लाभार्थ्यांची निवड :-**

अ सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी स्थानिक वृत्तपत्रात तसेच स्थानिक प्रसिध्दी माध्यमाद्वारे या योजनेला व्यापक प्रसिध्दी देतील.

ब) प्रसिध्दीनंतर परिशिष्ट - ब मध्ये असलेल्या विहित नमून्यात अर्ज मागवून घेतील. (अर्जाचा नमूना परिशिष्ट-ब येथे जोडला आहे) सर्व अर्जाची छाननी करुन वरील परिच्छेद २ मधील पात्रतेचे निकष पूर्ण करणा-या अशा लाभार्थ्यांची निवड करतील.

क) अर्ज वाटपाचे वेळी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी प्रत्येक अर्जावर अनुक्रमांक १, २, ३ असे ठळकपणे नमूद करतील.

५ **इतर :-**

१) या योजनेंतर्गत देण्यात येणा-या स्टॉलची पाहणी संबधित विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी किंवा त्यांचे पर्यवेक्षकीय अधिकारी वर्षातून एक वेळा करतील. ज्या कारणासाठी हा स्टॉल देण्यात आलेला आहे, त्याशिवाय इतर काही उद्योगासाठी जर हा स्टॉल वापरण्यात आला असेल तर तो स्टॉल रद्द करुन पुढील अनुक्रमांकाच्या लाभार्थ्यास देण्यात येईल.

२ एकदा लाभार्थ्यांना स्टॉलचा ताबा दिल्यानंतर त्या स्टॉलची देखभाल, त्याची दुरुस्ती इत्यादी बाबी संबंधित लाभार्थ्याने स्वत: करणे आवश्यक राहील.

३) गटई पत्र्याचे स्टॉल हे एका घरात एकाच व्यक्तीला दिले जाईल. स्टॉलचे डबल वाटप होणार नाही.

४) स्टॉल वाटप बाबतचे पत्र लाभार्थ्यांच्या फोटोसह स्टॉलमध्ये प्रथमदर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील.

५) ग्रामीण भाग, "क" वर्ग नगरपालिका, "ब" वर्ग "अ" वर्ग नगरपालिका तसेच महानगरपालिका क्षेत्रात व छावणी क्षेत्रात (कॅन्टॉन्मेंट बोर्ड) सदर गटई स्टॉलसाठी जागा उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी स्टॉलधारकाची राहील.

६) एकदा गटई स्टॉलचे वाटप झाल्यानंतर सदर स्टॉलची विक्री करता येणार नाही. तसेच ते भाडे तत्वावर देता येणार नाहीत व स्टॉलचे हस्तांतरण करता येणार नाही. याबाबत अनियमितता झाल्यास, सदर स्टॉल परत घेण्यात येईल.

७) स्टॉलधारकाने सदर स्टॉल कोणत्या जागेत लावलेला आहे यासाठी स्टॉलधारकाचे त्याच्या स्टॉल व जागेसह छायाचित्राचे रेकॉर्ड विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांनी अद्ययावत ठेवणे बंधनकारक आहे.

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोग, मुंबई
अध्यक्ष, सफाई कर्मचारी आयोग, महाराष्ट्र , मुंबई
प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई
संचालक, नगरपालिका प्रशासन, वरळी, मुंबई
संचालक (प्रसिध्दी), माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरीता)
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षक, मुंबई
सर्व जिल्हा कोषाकार अधिकारी
सर्व महानगरपालिका / नगरपालिका / जिल्हा परिषद / कॅन्टोन्मेंट बोर्ड
सामाजिक न्याय विभागातील सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी
संगणक कक्ष, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई (शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता)
निवड नस्ती, मावक २

२२०८

(19)

अर्जाचा अनुक्रमांक :-

फोटो

## गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉलकरीता अर्ज

१) अर्जदाराचे नांव :-

२) वडिलांचे संपूर्ण नांव :-
पतीचे नांव (महिलांसाठी)

३) कायमचा पत्ता :-
सध्याचा पत्ता :-

४) स्टॉल ज्या जागेत मागत आहे
तो पत्ता :- गावाची /शहराची लोकसंख्या :-

५) अर्जदार ज्या जागेत स्टॉल मागत आहे,
त्या जागेचा तपशील :-
(सदर जागा ग्रामपंचायत/नगरपालिका /
छावणी क्षेत्र (कॅन्टॉन्मेंट बोर्ड)/
महानगरपालिका यांनी भाडयाने/कराराने/
खरेदीने दिली किंवा स्वमालकीची आहे, त्याचा तपशील)

६) अर्जदाराची जन्मतारीख :- ७) जन्मस्थळ :-

८) अर्जदाराचे वय :-

९) जात :- १०) पोटजात :-

११) शिक्षण :-

१२) रेशन कार्ड क्रमांक :-

१३) अर्जदाराच्या वडिलांचा व्यवसाय :-
पतीचा व्यवसाय (महिलांबाबत) :-

१४) कुटूंबातील मिळवत्या व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न :- रुपये

(तहसिलदाराने निर्गमित केलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र)

| अ.क्र. | व्यक्तीचे नांव | वय | नाते | व्यवसाय/नोकरी | मासिक उत्पन्न रुपये | वार्षिक उत्पन्न रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

१५) बँक अथवा इतर महामंडळाकडून कर्ज किंवा अनुदान घेतले असल्यास तपशील :-

| अ. क्र. | व्यक्तीचे नांव | नांव | नाते | बँकेचे नांव व शाखा | बँकेचे कर्ज | थकबाकी | महामंडळाचे कर्ज | थकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

१६) **प्रतिज्ञापत्र :-**

मी सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो की, वरील संपूर्ण माहिती सत्य आहे. शासनाकडून मिळणा-या स्टॉलचा वापर मी फक्त गटई कामासाठीच करीन. या स्टॉलचा गैरवापर किंवा इतर धंद्यासाठी गैरवापर केल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहीन.

अर्जदाराची सही :-
किंवा अंगठ्याचा ठसा

दिनांक :-

अर्जदाराचे नांव :-

---

## (कार्यालयीन उपयोगासाठी)

१) अर्जदाराने दिलेले माहिती व कागदपत्रे छाननीअंती बरोबर असल्याचे आढळून येते.

२) "प्रथम येईल त्यास प्रथम" या तत्वावर अर्जदाराच्या अर्जाचा अनुक्रमांक हा असल्याने या योजनेखाली स्टॉल देण्यासाठी पात्र ठरविण्यात येत आहे.

दिनांक :-

विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी

---

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

१) अर्जदाराचा स्वतःचा प्राधिकृत अधिका-याने दिलेला जातीचा दाखला

२) चालू आर्थिक वर्षातील प्राधिकृत अधिका-याने दिलेला उत्पन्नाचा दाखला (**तहसिलदाराने निर्गमित केलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र)**

३) शाळा सोडल्याचा दाखला

४) रेशन कार्डाची झेरॉक्स (साक्षांकित प्रत)

५) अर्जदार ज्या जागेत स्टॉल मागत आहे, ती जागा ग्रामपंचायत / नगरपालिका/ महानगरपालिका व छावणी क्षेत्र (कॅन्टॉन्मेंट बोर्ड) यांनी भाडयाने/कराराने/खरेदीने/ स्वमालकीची असल्याबाबतचे भाडेचिठ्ठी, कराराची प्रत किंवा खरेदी खताची साक्षांकित प्रत.

परिशिष्ट क

115

## संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाने व क्षेत्रीय अधिका-यांनी करावयाची कार्यवाही

१) गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याबाबत गटई स्टॉलचा पुरवठा करण्याकरीता पर्चेस मॅन्युअल ऑफ आफीस प्रोसीजर फॉर पर्चेस ऑफ स्टोअर्स बाय द गव्हर्मेंट डिपार्टमेंट (पर्चेस मॅन्युअल) मधील तरतुदीनुसार पुरवठादाराकडून राज्यस्तरावर जाहिर निविदा मागविण्यासाठी जहिरात देण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई हे कार्यवाही करतील.

२) निविदा प्राप्त झाल्यानंतर त्या निश्चित करण्यासाठी उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार गटई स्टॉल खरेदी करण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली खरेदी समितीची स्थापना करतील. या समितीमध्ये मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेचा सहसंचालक/उपसंचालक, लेखाधिकारी, उप सचिव, उद्योग विभाग यांचा समावेश असेल. नियमानुसार निविदा प्रक्रीया पूर्ण करुन तसेच निविदा अंतीम करुन पुरवठादार निश्चित करतील व या पुरवठादारास गटई स्टॉल पुरवठा करण्याचे काम देण्यात येईल .

३) शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या संख्येच्या व पुरवठादाराकडून प्रत्यक्ष पुरवठा करावयाच्या स्टॉलच्या एकूण संख्येच्या किमतीच्या १०% परफॉर्मन्स बँक गॅरंटी व ३% सिक्यूरिटी डिपॉझिट घेण्यात येईल.

४) सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे त्यांच्या जिल्हयातील गटई स्टॉल पुरविण्यासाठी पात्र लाभार्थ्यांची निवड करुन त्यांची यादी संचालक, समाजकल्याण, पुणे यांच्याकडे पाठवतील व संचालक, समाजकल्याण पुणे हे सर्व जिल्हयांची एकत्रित यादी शासनाला पाठवतील. शासनाने मंजूर केलेल्या पात्र लाभार्थ्यांची यादी व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात येईल. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्या मागणीनुसार लिडकॉम, गटई स्टॉल विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना पुरवतील. लाभार्थ्यांना गटई स्टॉलचे वाटप विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे करतील.

५) गटई स्टॉल लाभार्थींपर्यंत खरोखरीच पोहोचले पाहिजेत, यासाठी संचालक, समाजकल्याण, पुणे/विभागीय समाजकल्याण अधिकारी /विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी पुरवठादाराकडून लाभार्थ्यांपर्यंत स्टॉल तयार होऊन तो लाभार्थ्यांपर्यंत पोचल्यानंतर मूळ पोचपावती (original receipt) घेऊन शासनास सादर करावी. तद्नंतर शासनाने मान्यता दिल्यानंतरच पुरवठादाराचे पेमेंट संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांनी करावे.

६) लाभार्थींची संख्या विचारात घेऊन व त्यानुसार एकत्रित प्रस्तावांचा विचार करुन आवश्यक असलेल्या रक्कमेची मागणी संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे शासनाकडे करतील व शासनाने तरतूद उपलब्ध करुन दिल्यानंतर संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे सदरची तरतूद व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांना सुपूर्द करतील.

७) (अ) स्टॉलसाठी वापरण्यात येणा-या व खरेदी केलेल्या मटेरियलची तपासणी करण्यासाठी शासनामार्फत तपासणी समिती गठित करण्यात येईल. सदर समितीचे अधिकारी / सदस्य शासनामार्फत वेळोवेळी ठरविण्यात येईल. यासाठी व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांनी, निविदाधारकांनी मटेरियल खरेदी केल्यानंतर आणि स्टॉल तयार करण्यापूर्वी शासनास कळवावे. त्यानंतर शासन तपासणीसाठी अधिका-यांना पाठवेल. तपासणी अधिकारी यांनी मटेरियल बरोबर असल्याचे प्रमाणित केल्यानंतरच काम सुरु करावे.

(ब) स्टॉल तयार झाल्यानंतर वापरासाठी ट्रान्सपोर्ट करण्याअगोदर व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांनी शासनास कळवावे. शासन तपासणीसाठी अधिकारी पाठवेल व शासनाने मान्यता दिल्यानंतर ट्रान्सपोर्ट करुन लाभार्थ्यांना वाटप करावे.

---

२०८